भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ५५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०८/२०१७

१) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे तिघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०३/०८/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी वंदन मालचंद मेश्राम वय ३५ वर्ष, रा. घाटपुरोडा हा लक्की बागडे, शिवराम साठवणे हे मोटार सायकल क्रमांक एमएच ३५ आर ९७६२ वर बसुन देव्हाडी रोडवरुन डांबरी रोडने मुंडीकोटा गावाकडे जात असतांना विरुध्द दिशेने येणाऱ्या चारचाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक देवुन मोटार सायकलवर बसलेल्या तिघांनाही जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने फिर्यादी याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. सहकलम १३४(अ)(ब),१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

२)अवैध बांधकाम काढुन टाकण्याचे नोटीस बजावुन लोकसेवकाने जारी केलेल्या कायदेशीर आदेशाचीअहवहेलना केल्याने गुन्हा नोंद. :—

**अ)** दिनांक २०/०४/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी आनंद नगिन मिश्रा वय ४४ वर्ष, नगर परिषद लिपीक भंडारा यांनी आरोपीस अवैध बांधकाम काढुन टाकण्याचे वेळोवेळी नोटीस बजावुन सांगितले परंतु आरोपीने लोकसेवकाने जारी केलेल्या कायदेशीर आदेशाची अवहेलना केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८८ भादंवि. सहकलम ५२(१)(अ),महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधि. १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. फटींग पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक २०/०४/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी आनंद नगिन मिश्रा वय ४४ वर्ष, नगर परिषद लिपीक भंडारा यांनी आरोपीस अवैध बांधकाम काढुन टाकण्याचे वेळोवेळी नोटीस बजावुन सांगितले परंतु आरोपीने लोकसेवकाने जारी केलेल्या कायदेशीर आदेशाची अवहेलना केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८८ भादंवि. सहकलम ५२(१)(अ),महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधि. १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

३) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या इसमास धडक मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक २७/०७/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी हे सत्यवान मगरुजी माकडे वय ३० वर्ष, रा. कोंढा हा पायी फिरण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

४) अचानक प्रकृती बिघडल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—

दिनांक ०३/०८/२०१७ चे २१.३० वा. दर. यातील मृतक शंकर अत्तुजी सुर्यवंशी वय ६० वर्ष, रा. ओम नगर खात रोड खोकरला याची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोउपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे आणले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने मृतकांच्या मुलाचे बयान, डॉक्टरी रिपोर्ट तसेच सरतर्फे फिर्यादी पोना. दिनेश शहारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग

५) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :-

दिनांक ०२/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील मृतक गणेश बाबुराव खंडार वय ३४ वर्ष, रा. परसोडी याने दारुचे नशेत कोणती तरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोकरीता करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो. स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. लांजेवार यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक ०४/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक ०५, तीन सिटर वाहनांवरती ३३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०६ केसेस करण्यात आलेल्या आहे.

05.8

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.